# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २०१- २३** **दिनांक : - २६/०६/२०२३**

## सायकल चोरी करण्या-या सराईत गुन्हेगारास अटक करुन ०६ गुन्हयांची उकल विरार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

विरार पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या महिला फिर्यादी नामे सौ. ब्रेंडा शंतनु रॉय, रा. फ्रंट व्हिव, कॉ. ऑप, हौ,सोसा, पुष्पानगर, विरार यांनी त्यांची हिरो प्रींट कंपनीची सायकल राहत असलेल्या ठिकाणी मोकळया जागेत पार्क केली असता ती दिनांक १२/०६/२०२३ रोजी सकाळी ०४.३० वा. ते ०८.०० वा. चे दरम्याने कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी केलेबाबत फिर्याद दिल्याने विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. ५७५/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ अन्वये दाखल करण्यात आला होता.

मागील काही महिन्यांमध्ये विरार पोलीस ठाणे हद्दीत दिवसा व रात्री सायकल चोरी गुन्हयांचे प्रमाण वाढले होते. नमुद गुन्हयांचे वाढते प्रमाण लक्षात घेता वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हयांचा तपास विरार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाने सुरु केला.

नमुद गुन्ह्यातील आरोपीताचा शोध घेणेकरीता घटनास्थळ व परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेजचे अवलोकन तसेच गुप्त बातमीदाराकरवी प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत हा दिवा साबे ता.जि. ठाणे येथे राहत असल्याचे निष्पन्न झाले होते. त्याअनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी दिवा गाव याठिकाणी सलग दोन दिवस सापळा रचुन आरोपी अंश ऊर्फ संदीप माताप्रसाद जैस्वाल, सध्या रा. साबेगाव दिवा ता. जि. ठाणे मुळ रा. ग्राम फतेहपुर, तहसील, लमुहा, थाना पिपरपुर, जि-सुल्तानपुर, राज्य-उत्तरप्रदेश यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली आहे. वर नमुद अटक आरोपीताकडे अधिक तपास करुन ०६ गुन्हयांची उकल करण्यात आली आहे व गुन्हयात चोरी केलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

### -:उघडकीस आलेले गुन्हे:-

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.क्र., कलम |
|---|---|---|
| १) | विरार | गु.रजि.नं ५७५/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ अन्वये (मुळ गुन्हा) |
| २) | विरार | गु.रजि.नं ५२९/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ अन्वये |
| ३) | विरार | गु.रजि.नं ५२२/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ अन्वये |
| ४) | विरार | गु.रजि.नं ४६६/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ अन्वये |

| | | |
|---|---|---|
| ५) | विरार | गु.रजि.नं ४११/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ अन्वये |
| ६) | विरार | गु.रजि.नं ३२१/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुखे, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कांबळे, पो.नि. श्री. दिलीप राख (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.उप.नि. संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, संदीप जाधव, इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, संदीप शेरमाळे, योगेश नागरे, पो.अमं. मोहसिन दिवान, सचिन,बळीद, बालाजी गायकवाड, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार यांनी केली आहे.



*********